**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ याची शपथेवर साक्ष

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः याकुब अयुब तडवी ,

वयः ४१ वर्षे, व्यवसायः नोकरी, पोलिस शिपाई ब.क्र.२४१२,

राहणारः रोहा, ता. रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांचे मार्फत शपथेवर सुरु**

०१. पोलिस स्टेशन, कोलाड येथील गुन्हा क्र. ६०/२०१८ मध्ये तपास अधिकारी श्री. एस.आर.माने यांनी आरोपीकडून जप्त केलेल्या दारुमधून १८० मि.ली दारु सी.ए.परीक्षणाकरीता वेगळी सिलबंद केली होती. ती त्यांनी मला पत्र् दिनांक ३०.१०.२०१८ जा.क्र. १८४९/२०१८ अन्वये कलिना मुबंई येथील प्रयोगशाळेमध्ये जमा करण्याकरीता ताब्यात दिली. सदर पत्रावर माझी सही असून त्यांतील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याच यापुर्वी नि. क्र.२२ देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे मी नमुद बॉटल प्रयोगशाळेमध्ये जमा करुन पत्राची स्थळ प्रत तपास अधिकारी श्री. माने यांना सुपूर्द केली.

सरतपासणी पूर्ण.

**उलटतपासणी आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती. एस.एस. सानप यांचेमार्फत.**

०२. पत्र नि.क्र.२२ हे मला पोलीस स्टेशनमधील मुददेमाल कारकुन यांनी दिले होते. ते त्यांनी दिल्याची तारीख आज मला आठवत नाही. दिनांक ३०/१०/२०१८ रोजी मी बसने गेलो होतो. मी बस प्रवासाकरीता वॉरंटचा वापर केला

होता. त्याची प्रत मी तपासी अधिकारी यांना दिली नाही. त्याची प्रत मी ठाणे अंमलदार यांना दिली होती.

०३. हे म्हणणे खरे नाही की, पोलिस स्टेशन, कोलाड येथील गुन्हा क्र. ६०/२०१८ मध्ये तपास अधिकारी श्री. एस.आर.माने यांनी आरोपीकडून जप्त केलेल्या दारुमधून १८० मि.ली दारु सी.ए.परीक्षणाकरीता वेगळी सिलबंद केली नव्हती, ती त्यांनी मला पत्र् दिनांक ३०.१०.२०१८ जा.क्र. १८४९/२०१८ अन्वये कलिना मुबंई येथील प्रयोगशाळेमध्ये जमा करण्याकरीता ताब्यात दिली नव्हती, सदर पत्रावर माझी सही नसून त्यांतील मजकुर खरा व बरोबर नाही, त्याच यापुर्वी नि. क्र.२२ देण्यात आलेली नाही, त्याप्रमाणे मी नमुद बॉटल प्रयोगशाळेमध्ये जमा करुन पत्राची स्थळ प्रत तपास अधिकारी श्री. माने यांना सुपूर्द केली नव्हती.

उलटतपासणी पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.11.26 18:02:19 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.२६.११.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.